॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

## परिपत्रक क्रमांक :१७६/२०२०

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित **जळगाव, भुसावळ व अमळनेर ह्या तीन** शहरांमधील सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक,
तसेच विद्यापीठातील सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक/विभागांचे प्रमुख,
विद्यापीठाचे सर्व प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख/नियंत्रक अधिकारी व विद्यापीठ उपकेंद्राचे मा. संचालक,

**विषय :-** दिनांक ०७ ते १३ जुलै,२०२० पर्यंत टाळेबंदी (लॉकडाऊन) काटेकोरपणे पाळण्याबाबत. . .

**संदर्भ:-** (१) मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांचे कार्यालयाकडील **आदेश** जा.क्र. दंडप्र ०१/ २०२०/३५३, दि. ४ जुलै,२०२०
(२) विद्यापीठाचे परिपत्रक १७५/२०२०, दि.३० जून, २०२०

उपरोक्त संदर्भांकित क्र. एक (०१) मध्ये नमूद शासन आदेश / पत्रकाची प्रत विद्यापीठाच्या ह्या परिपत्रकासोबत जोडली आहे कृपया, त्याचे बारकाईने अवलोकन करावे.

कोरोना विषाणूंच्या प्रसारामुळे आरोग्य विषयक गंभीर समस्या निर्माण झाली असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून विद्यापीठाने महाराष्ट्र शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून मा.कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केली आहेत.

महाराष्ट्र शासनाने संचारबंदीच्या पार्श्वभूमीवर वेळोवेळी आदेश निर्गमित करून टाळेबंदीच्या कालावधीमध्ये वाढ करण्याचे सुचविले होते. त्या अनुषंगाने विद्यापीठाने ह्यापूर्वी वेळोवेळी परिपत्रके निर्गमित करून **परिपत्रक क्र.१७५/२०२०** अनुसार टाळेबंदीचा कालावधी **दिनांक ३१ जुलै, २०२०** पर्यंत वाढविलेला आहे.

तथापि, जळगाव जिल्ह्यात कोविड-१९ बाधित व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांना वेळोवेळी सूचना, निर्देश आदेश निर्गमित करूनही नागरिक / व्यक्ती मोठ्या प्रमाणावर अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी गर्दी करीत असल्याचे दिसून येत असल्यामुळे कोविड-१९ विषाणूंचा संसर्ग रोखण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी ह्यांनी उपरोक्त संदर्भांकित क्र. एक (०१) मध्ये नमूद केलेल्या आदेशान्वये अमळनेर, भुसावळ ह्या नगरपालिकांच्या व जळगाव महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात नागरिकांचे व्यवहार, मुक्तपणे संचार त्यावर निर्बंध लागू करण्याच्या दृष्टीने दिनांक ०७ ते १३ जुलै, २०२० पर्यन्त टाळेबंदी (लॉकडाऊन) जाहीर केली आहे.

तेव्हा, कोविड-१९ विषाणूचा वाढता प्रसार व वाढती रूग्ण संख्या लक्षात घेता, **जळगाव, भुसावळ व अमळनेर** या ह्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात कोविड-१९ बाधित रूग्ण संख्या आढळून येत असल्यामुळे **दि.०७ ते १३ जुलै,२०२० पर्यंत** टाळेबंदी (लॉकडाऊन) जाहीर करण्यात येत असल्याने उपरोक्त कार्यक्षेत्रातील महाविद्यालये/परिसंस्था, व विद्यापीठाचे उपकेंद्र **पूर्णपणे बंद** राहातील. तथापि, विद्यापीठात कार्यरत काही कर्मचारी हे भुसावळ, अमळनेर ह्या शहरामध्ये, तर बहुतांशी कर्मचारी जळगाव शहरातील विविध प्रभागांमध्येच राहात असल्याने विद्यापीठातील प्रशासकीय विभाग, प्रशाळा / संस्थाही **पूर्णवेळ बंद** राहातील.

जळगाव, भुसावळ व अमळनेर शहरांच्या हद्दीत दि.०७ ते १३ जुलै,२०२० ह्या कालावधीत लॉकडाऊनची काटेकोरपणे अंमलबजावणी करतांना ह्या तिन्ही शहरांमधील महाविद्यालये, परिसंस्था, विद्यापीठ उपकेंद्र तसेच विद्यापीठीय प्रशाळा, शैक्षणिक संस्था, प्रशासकीय विभाग पूर्णवेळ बंद ठेवायचे असले तरी ह्या संकुलामध्ये कार्यरत **वैद्यकीय सुविधा, सुरक्षा, वाहने, स्वच्छता / साफसफाई, पाणीपुरवठा, विद्युत ह्यासह अत्यावश्यक सेवेतील सर्व प्रकारांचे स्थायी, अस्थायी, कंत्राटी ठेकेदाराकडील कर्मचारी/अधिकाऱ्यांनी मास्क, सॅनिटायझेशन, किमान शरीरिक अंतर ह्यासह निर्धारित नियमांच्या अंमलबाजावणीसह उपस्थित राहावयाचे आहे.**

..२..वर

..२..

**परीक्षांच्या निकालांच्या संदर्भातील कामकाजासाठी संबंधित महाविद्यालये, परिसंस्था, विद्यापीठीय प्रशाळा / शैक्षणिक संस्था, प्रशासकीय विभागातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांना मौखिक/लिखित अशा कोणत्याही मार्गाने सुचित केल्यानुसार उपरोक्त सुरक्षा नियमांच्या अंमलबजावणीसह निर्धारित दिवशी / वेळेत उपस्थित राहावयाचे आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी स्वतःजवळ महाविद्यालये, परिसंस्था वा विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र जवळ बाळगणे अत्यावश्यक आहे, त्याची कृपया नोंद घ्यावी.**

टाळेबंदी नंतर **दि. १४ जुलै, २०२० पासून** विद्यापीठ **परिपत्रक क्र. १६९ व १७५/२०२०** अनुसार Mission Begin Again ह्या अंतर्गत मर्यादित उपस्थितीच्या काळात विद्यापीठ / महाविद्यालये, परिसंस्था ह्यातील कर्मचारी संख्येनुसार आळीपाळीने (रोटेशन) कार्यालयीन उपस्थिती निश्चित करण्यासाठी सर्व संबंधित विभाग प्रमुख/नियंत्रक अधिकारी यांनी आवश्यक ती उपाययोजना करण्यासंदर्भात सविस्तर कळविण्यात आले आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

तेव्हा, मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधकारी ह्यांच्या कार्यालयाकडील आदेश जा.क्र. दंडप्र-०१/२०२०/३५३ दि. ४ जुलै,२०२० च्या आदेशातील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित **जळगाव, भुसावळ व अमळनेर या शहरांमधील** महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था ह्यांचे सर्व मा. प्राचार्य / मा. संचालक व शिक्षक तसेच विद्यापीठातील सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा. संचालक / विभागप्रमुख व शिक्षक यांनी वरील संदर्भीय आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी आपल्या स्तरावरून करावी.

**सदरचे निर्देश हे दि.१३ जुलै,२०२० पर्यंत लागू रहातील.**

**सोबत :-** मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधकारी यांचे कार्यालयाकडील आदेश जा.क्र. दंडप्र ०१/२०२०/ ३५३ दि. ४ जुलै,२०२० ची प्रत.

आदेशान्वये,

जा.क्र.कबचौउमवि/२/कोरोना(कोविड-१९)/२३६/२०२०
दि. ०६ जुलै,२०२०

K.B.C. NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001

(प्रा. भा. व्यं. पवार)
**प्र. कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी.**

१. मा. व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य व अधिष्ठाता, कबचौउमवि-जळगाव. २. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव. ३. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव. ४. मा.शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१. ५. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव. ६. मा. संचालक, परिक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि-जळगाव, ७. मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि-जळगाव.

महसूल व वन विभाग
# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव
(गृह शाखा)
आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001
**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152
**ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले :-** 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 29 जून, 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/348, दिनांक 02 जुलै, 2020

-----0000-----

क्र दंडप्र-01/कावि/2020/353 दिनांक 4 जुलै, 2020

## आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, जळगांव जिल्हयामध्ये कोव्हिड-19 बाधित व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांना वेळोवेळी सुचना , निर्देश, आदेश निर्गमित करुनही नागरिक / व्यक्ती मोठया प्रमाणावर अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी गर्दी करीत असल्याचे दिसून येत असल्यामुळे कोव्हिड-19 विषाणूचा संसर्ग रोखण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

आणि ज्याअर्थी, कोव्हिड-19 विषाणूचा वाढता प्रसार व वाढती रुग्ण संख्या लक्षात घेता, जळगांव जिल्हयातील मोठया प्रमाणात कोव्हिड-19 बाधित रुग्ण संख्या आढळून आलेल्या हॉटस्पॉटच्या ठिकाणी / क्षेत्रात नागरिकांचे व्यवहार, मुक्तपणे संचार यावर निर्बंध लागू करणे आवश्यक आहे, याबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी, **अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन **जळगांव जिल्हयातील जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्र, भुसावळ नगरपालिका क्षेत्र व अमळनेर नगरपालिका क्षेत्रात दिनांक 07 जुलै, 2020 चे सकाळी 05.00 वाजेपासून ते दिनांक 13 जुलै, 2020 चे रात्री 12.00 वाजेपावेतो लॉकडाऊन जाहीर करीत आहे.**

सदरच्या लॉकडाऊन कालावधीत जळगांव जिल्हयातील जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्र, भुसावळ नगरपालिका क्षेत्र व अमळनेर नगरपालिका क्षेत्रात केवळ खालील बाबी लागू राहतील.

1) सर्व औषधी दुकाने (मेडीकल स्टोअर्स), दुध विक्री व खरेदी व्यवहार / केंद्रे सुरु राहतील. **तथापि नागरिक / व्यक्ती यांना केवळ त्यांचा रहिवास असणा-या प्रभागाच्या परिघातच वरीलप्रमाणे खरेदी / विक्रीचे**

Scanned by TapScanner

**व्यवहार करता येतील. तसेच औषधे, दुध यांच्या खरेदीसाठी कोणत्याही व्यक्ती / नागरिक यांना कोणत्याही स्वयंचलीत वाहनांचा (उदा. दुचाकी/ तीनचाकी / चारचाकी) वापर अनुज्ञेय असणार नाही.**

2) कृषी उत्पन्न बाजार समिती, जळगांव, कृषी उत्पन्न बाजार समिती, भुसावळ व कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर येथे केवळ ठोक / घाऊक खरेदी विक्रीचे व्यवहार सुरु राहतील. कोणत्याही प्रकारे कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये किरकोळ खरेदी विक्री करणा-या व्यक्ती / नागरिक यांना प्रवेश असणार नाही. तसेच सर्व व्यवहार हे नियंत्रित पध्दतीने पार पाडले जातील व त्या ठिकाणी मास्क, सॅनिटाईजरचा वापर केला जाईल याची दक्षता घेण्याची **संपूर्ण जबाबदारी संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव यांची राहील.** त्याचबरोबर सदर ठिकाणी नागरिकांची अनावश्यक गर्दी होणार नाही व सर्व व्यवहार सुरळीतपणे / नियंत्रितपणे पार पाडले जातील याचे सनियंत्रण **जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था जळगांव** यांनी करावे.

3) केवळ Serious Medical Emergency असेल किंवा तज्ञ डॉक्टरांच्या उपचाराची गरज असेल (रहिवासाच्या प्रभागात उपलब्ध नसल्यास) तरच संबंधित व्यक्ती / नागरिक यांना प्रभागाच्या बाहेर जाता येईल.

4) जळगांव जिल्हयातील जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्र, भुसावळ नगरपालिका क्षेत्र व अमळनेर नगरपालिका क्षेत्रात रहिवास करणारे व ज्यांची शेती नमूद क्षेत्राच्या बाहेर आहे, अशा शेतक-यांना केवळ शेतीविषयक कामे करण्यासाठी, शेतीसाठी लागणारी औषधे, बी-बियाणे, किटकनाशके, खते खरेदी करण्यासाठी संबंधित क्षेत्राच्या बाहेर ये-जा करता येईल. तथापि संबंधितांना त्यांच्या शेतीचा 7/12 उतारा सादर करणे आवश्यक राहील.

5) वर नमूद केलेल्या बाबी वगळता जळगांव जिल्हयातील जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्र, भुसावळ नगरपालिका क्षेत्र व अमळनेर नगरपालिका क्षेत्रातील सर्व सेवा, सर्व आस्थापना, सर्व दुकाने (किरकोळ व होलसेल दोनही), सर्व प्रकारचे उद्योग व कंपन्या (एमआयडीसी वगळून), सर्व प्रकारची वाहतूक पूर्णपणे बंदच राहतील.

6) अत्यावश्यक सेवेमध्ये समाविष्ठ असणारी शासकीय / निमशासकीय कार्यालये सुरु राहतील. उदा. आरोग्य विभाग, पोलीस विभाग, महसूल विभाग, अग्निशमन विभाग, एमएसईबी, महानगरपालिका व नगरपालिका कार्यालये, बँका, वित्तीय संस्था व आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व कार्यालये. तथापि सर्व शासकीय अधिकारी /कर्मचारी यांनी ओळखपत्र बाळगणे अनिवार्य राहील.

7) जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्र, भुसावळ नगरपालिका क्षेत्र व अमळनेर नगरपालिका क्षेत्रातील पेट्रोल / डिझेल पंप चालक / मालक यांनी केवळ वर प्रमाणे सूट देण्यात आलेल्या अत्यावश्यक सेवेतील अधिकारी / कर्मचारी , ॲम्ब्युलन्स, कोव्हिड-19 च्या पार्श्वभूमीवर अधिग्रहीत करण्यात आलेली शासकीय वाहने यांना संबंधितांचे शासकीय ओळखपत्र पाहून पेट्रोल / डिझेल विक्री करावे. तसेच वर नमूद मुद्दा क्रमांक 01 ते 05 मध्ये नमूद केलेल्या बाबींसाठी आवश्यक असणा-या व्यक्तींनाच पेट्रोल / डिझेल विक्री करावी.

8) सदर लॉकडाऊन कालावधीत उक्त नमूद क्षेत्रातील लग्न समारंभ हे 50 व्यक्तींच्या मर्यादेच्या अधिन राहूनच नियंत्रित पध्दतीने पार पाडले जातील. तथापि याबाबतची पूर्व सूचना संबंधितांनी स्थानिक प्रशासन व स्थानिक पोलीस स्टेशन यांना देणे बंधनकारक राहील. तसेच 20 लोकांच्या मर्यादेच्या अधिन राहून अंत्यविधी पार पाडता येईल.

सदरचा आदेश हा केवळ **जळगांव जिल्हयातील जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्र, भुसावळ नगरपालिका क्षेत्र व अमळनेर नगरपालिका क्षेत्राकरीताच लागू असेल. तसेच जळगांव जिल्हयातील उर्वरीत क्षेत्रातील व्यवहार हे या कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आलेला आदेश दिनांक 02 जुलै, 2020 मध्ये नमूद केलेल्या बाबींनुसार सुरु राहतील.**

Scanned by TapScanner

**सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पोलीस विभाग जळगांव, महानगरपालिका, जळगांव, नगरपालिका भुसावळ व अमळनेर यांची राहील.**

सदर आदेशाचे उल्लंघन अथवा भंग केल्यास सदर बाब ही आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897, भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र राहील.

**सदरचा आदेश यासोबतच्या परिशिष्ट-अ सह वाचावे.**

सदरचा आदेश हा आज दिनांक ०५जुलै, 2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

(अभिजीत राऊत) ०५.०७.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**सहपत्र : परिशिष्ट-अ**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपवनसंरक्षक,जळगांव वन विभाग,जळगाव
5. उपवनसंरक्षक, यावल वन विभाग,जळगांव
6. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, जळगांव
7. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
8. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
9. जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव
10. उप जिल्हाधिकारी रोहयो.जळगांव
11. जिल्हा कोषागार अधिकारी,जळगांव
12. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
13. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
14. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
15. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,जळगांव
16. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
17. सहायक कामगार आयुक्त,जळगांव
18. सहायक संचालक,अन्न व प्रशासन ,जळगांव
19. जिल्हा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र ,जळगांव
20. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,जळगांव
21. उप अभियंता, एम.आय.डी.सी.जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned by TapScanner

## परिशिष्ट-अ

(कालावधी दिनांक 07 जुलै, 2020 ते दिनांक 13 जुलै, 2020 पावेतो)

| अ.क्र | तपशिल | जळगांव शहर महानगर पालिका क्षेत्र, भुसावळ नगरपालिका क्षेत्र व अमळनेर नगरपालिका क्षेत्राकरीता | जळगांव जिल्हयातील उर्वरीत क्षेत्राकरीता | प्रतिबंधित क्षेत्राकरीता (Containment Zone) |
|---|---|---|---|---|
| 1 | रेल्वे, बस, विमान सेवा | बंद | सुरु | बंद |
| 2 | जिल्हयांतर्गत प्रवासी वाहतूक | बंद | सुरु | बंद |
| 3 | टॅक्सी, कॅब, रिक्षा | बंद | सुरु | बंद |
| 4 | चारचाकी वाहने (अत्यावश्यक वैद्यकीय सेवेची गरज वगळून) | बंद | सुरु | बंद |
| 5 | **दुचाकी वाहने (अत्यावश्यक सेवेतील अधिकारी / कर्मचारी वगळून)** | केवळ 1 वाहन चालक (फक्त वैद्यकीय कारणास्तव) | केवळ 1 वाहन चालक | बंद |
| 6 | शैक्षणिक संस्था | बंद | सुरु | बंद |
| 7 | हॉटेल / रेस्टॉरंट पार्सल सुविधा (होम डिलीव्हरी / टेक अवे) | सुरु | सुरु | बंद |
| 8 | **मेडीकल स्टोअर्स,** | **सुरु** | **सुरु** | **सुरु** |
| 9 | **OPD** | **सुरु** | **सुरु** | **बंद** |
| 10 | **भाजीपाला / फळे खरेदी-विक्री केंद्रे** | **बंद** | **सुरु** | **बंद** |
| 11 | **दुध खरेदी-विक्री केंद्रे** | **सुरु** | **सुरु** | **बंद** |
| 12 | धार्मिक स्थळे | बंद | बंद | बंद |
| 13 | सभा/ मेळावे/बैठका | बंद | बंद | बंद |
| 14 | **कृषी संबंधित कामे** | **सुरु** | **सुरु** | **बंद** |
| 15 | औद्योगिक आस्थापना (एमआयडीसी वगळून) | बंद | सुरु | बंद |
| 16 | शासकीय / खाजगी (मान्सून पूर्व कामे वगळून) बांधकामे | बंद | सुरु | बंद |
| 17 | कृषी सेवा केंद्रे | सुरु | सुरु | बंद |
| 18 | शॉपींग मॉल्स / मार्केट | बंद | बंद | बंद |
| 19 | किराणा दुकाने | बंद | सुरु | बंद |
| 20 | लिकर शॉप | बंद | सुरु | बंद |
| 21 | बार्बर शॉप, स्पा, सलून | बंद | सुरु | बंद |
| 22 | खाजगी कार्यालये | बंद | सुरु | बंद |
| 23 | **शासकीय कार्यालये** | **सुरु** | **सुरु** | **सुरु** |
| 24 | **बँका व वित्तीय संस्था, पोस्टल सेवा** | **सुरु** | **सुरु** | **बंद** |
| 25 | कुरीअर | बंद | सुरु | बंद |
| 26 | इलेक्ट्रीशिअन , प्लंबर | बंद | सुरु | बंद |
| 27 | गॅरेज, वर्कशॉप्स | बंद (अत्यावश्यक सेवा वगळून) | सुरु | बंद |
| 28 | Non-Essential इतर सर्व दुकाने | बंद | सुरु | बंद |
| 29 | गार्डन, पार्क, बगीचे | बंद | सुरु | बंद |

जिल्हाधिकारी जळगांव

(अभिजीत राऊत) 05.07.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव

Scanned by TapScanner